महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# अपंग व्यक्तींचे मानवाधिकार व त्यासाठी आखलेला

# महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा -२०११

## अपंग कल्याण आयुक्तालय,

### महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे १

# प्रस्तावना

१.१ **अपंगत्वाची व्याख्या** :

"अपंगत्व" व "अपंग व्यक्ती" अथवा अनोख्या समर्थ व्यक्ती (Differently Abled Persons) म्हणजे अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मध्ये नमूद केलेल्या व्याख्येप्रमाणे आणि अपंग व्यक्तीच्या कल्याणार्थ जो कायदा अंमलात आणला जाईल त्याप्रमाणे राहील.

**१.२ अपंग व्यक्तींची लोकसंख्या :**

भारत देशाच्या सन २००१ च्या सार्वत्रिक जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील अपंग व्यक्तींची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **अपंगत्वाचा प्रकार** | **अपंग व्यक्तींची संख्या** | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रीया | एकूण |
| १ | अंध | ३२०४६६ | २६०४६४ | ५८०९३० |
| २ | मुके | ६३८०२ | ४९२४१ | ११३०४३ |
| ३ | बहिरे | ५१७८९ | ४०६०१ | ९२३९० |
| ४ | अस्थिव्यंग | ३७४६७१ | १९५२७४ | ५६९९४५ |
| ५ | मतिमंद | १२३१३९ | ९०१३५ | २१३२७४ |
| | **एकूण** | **९,३३,८६७** | **६,३५,७१५** | **१५,६९,५८२** |

महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या १.०६ टक्के एवढी अपंग व्यक्तींची लोकसंख्या आहे.

**१.३ दृष्टीक्षेप :**

अपंग व्यक्तींमधील व्यंग न पहाता, "अनोखे सामर्थ्य असलेले व्यक्तीमत्व" असे संबोधून त्यांच्यामध्ये असलेले सामर्थ्य व क्षमता ओळखून त्या विकसित करण्यासाठी अपंगत्वाचे लवकर निदान, त्वरीत हस्तक्षेप, शिक्षण, व्यवसायिक प्रशिक्षण, नोकरी इत्यादी क्षेत्रामध्ये त्यांना संधी देवून आणि कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यामध्ये जिद्द, आत्मविश्वास निर्माण होऊन ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सामान्य व्यक्तींसारखे सन्मानपूर्वक जीवन व्यथीत करतात ही बाब लक्षात घेवून शासनाने पुढील दृष्टीकोन (व्हीजन) ठेवला आहे.

प्रतिष्ठा आणि सन्मान
अनोख्या समर्थ व्यक्तींसाठी
... त्यांचे सामर्थ्य, कौशल्य आणि
जीवनाकडे पहाण्याचा आश्वासक
दृष्टीकोन यांना दाद देत
... त्यांच्या सुप्त सामर्थ्यांचा
वापर करुन घेत, त्यांना समाजाच्या
मुख्य प्रवाहात आणण्यासाठी...

A Life of Dignity and Respect
for
Differently Abled Perosns
To optimise their ability, skill
and to enhance
their parivipation in the
min-stream of the society by
utilising that under-tapped asset.

## १.४ अस्तित्वात असलेले कायदे व यंत्रणा:

अपंग व्यक्तींकरीता खालीलप्रमाणे कायदे व यंत्रणा कार्यरत आहेत.

(एक) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि सपुंर्ण सहभाग) अधिनियम १९९५.

(दोन) महाराष्ट्र राज्य अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि सपुंर्ण सहभाग) नियम २००१.

(तीन) आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग व मतिमंद व्यक्तींकरीता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९.

(चार) युनायटेड नेशन्स कन्व्हेंशन फॉर दि राईट ऑफ पर्सन्स विथ डिसॅब्लीटीज २००६.

(पाच) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे गठीत करण्यात आलेली राज्य समन्वय समिती.

(सहा) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे गठीत करण्यात आलेली राज्य कार्यकारी समिती.

(सात) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(आठ) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई.

(नऊ) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अपंग अधिनियम १९९५ च्या कायद्यातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली जिल्हास्तर समिती.

(दहा) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी गठीत करण्यात आलेले वैद्यकीय मंडळ (Medical Board).

(अकरा) राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९ मधील तरतूदीप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली स्थानिकस्तर समिती.

* * *

# २. राज्याचे धोरण

अनोखे सामर्थ्य असलेल्या व्यक्ती ही महाराष्ट्र राज्याचे मनुष्यबळ व साधन संपत्तीतील महत्वाचा घटक मानून योग्य अशा वातावरणात त्यांना समाजाच्या सर्वच क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा संपुर्ण सहभाग घेण्यात येईल आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने राज्याच्या धोरणामध्ये प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ठ करण्यात येत आहेत.

## २.१ आरोग्याचा मानवाधिकार

जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याच्या केलेल्या व्याख्येप्रमाणे आरोग्य म्हणजे केवळ “शारिरीक सुदृढता” नसून एखाद्या व्यक्तीची “शारिरीक, मानसिक व सामाजिक सुदृढता” या संकल्पनेप्रमाणे आरोग्याचा विचार करताना प्रोत्साहन, प्रतिबंध, प्रतिकार आणि पुनर्वसन या बाबींकडे लक्ष देण्यात येईल. ही संकल्पना अंमलात आणण्यासाठी अपंग अधिनियम १९९५ च्या कलम २५ मधील तरतूदीप्रमाणे अपंगत्वाचा शोध, सर्व्हेक्षण, प्रतिबंधात्मक लसीकरण, बालकांची आरोग्य विषयक तपासणी, प्रसुतीपुर्व गर्भावस्थेत व प्रसुतीनंतर स्त्रियांच्या आरोग्याची दक्षता, प्रसुतीनंतर बालकांची काळजी, सार्वजनिक आरोग्य व परिसर स्वच्छता, आरोग्य विषयक माहिती देण्याकरीता अंगणवाडी सेविका, ग्रामसेविका, ग्रामपंचायत सदस्य व अन्य ग्रामिण स्तरावरील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण, वैद्यकीय तपासणी शिबिरांचे आयोजन व दुरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे, नियतकालिके, पथनाट्य व भित्तीपत्रके इत्यादी माध्यमातून अपंगत्वाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा प्रचार व प्रसार या करीता विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाचा प्रभावीपणे वापर करण्यात येईल.

## २.२ वैद्यकीय व पुनर्वसन सेवा:

अपंगत्वाचा शोध व सर्व्हेक्षण घेतल्यानंतर अपंग सदृष्य व्यक्तींना वैद्यकीय उपचार, शस्त्रकीया, कृत्रिम अवयव व साधने पुरविणे, भौतिक उपचार, व्यवसाय उपचार, मानस शास्त्रीय उपचार, मार्गदर्शन व सल्ला, प्रमाणपत्रे इत्यादी वैद्यकीय सेवा शासनाच्या आरोग्य विभागामार्फत शासकीय जिल्हा रूग्णालये, ग्रामिण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे इत्यादीमधून तसेच तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करून, उपलब्ध करून देण्यात येतील. यासाठी शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, शिक्षण विभाग, केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेले जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रे व कृत्रिम अवयव व साधने पुरविणाऱ्या संस्था, स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांचा सहभाग करून घेण्यात येऊन राज्यातील सर्व अपंग व्यक्तींना यासुविधा मोफत / सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येतील.

## २.३ शिक्षण:

अपंग अधिनियम १९९५ च्या कलम २६ ते ३१ मधील तरतूदीप्रमाणे अनोखे सामर्थ्य असलेल्या व्यक्तींच्या विकासासाठी शिक्षण हा महत्वाचा घटक असल्यामुळे १८ वर्षापर्यंतच्या प्रत्येक अपंग मुलांची मोफत शिक्षणाची व्यवस्था शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उच्च शिक्षणाच्या सुविधा योग्य अशा वातावरणात अपंग व्यक्तींना उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती, शाळा महाविद्यालयाच्या इमारती, अडथळा विरहीत करणे, मोफत प्रवासाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, इत्यादी उपाययोजना करण्यात येतील.

अपंग मुलांना सर्वसामान्य मुलांबरोबर शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. याकरीता केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेची तसेच एकात्मिक शिक्षण युनिट योजनेचे प्रभावीपणे सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल. सामान्य मुलांबरोबर अपंग व्यक्तींना शिक्षण घेता यावे यासाठी सामान्य शाळेतील शिक्षकांना अपंगांच्या शिक्षणाविषयीचे प्राथमिक प्रशिक्षण, शैक्षणिक साधने व उपकरणे, कृत्रिम अवयव साधने, शिष्यवृत्त्या, अभ्यासक्रमात योग्य ते फेरबदल, परिक्षेसाठी लेखनिक व जादा वेळ इत्यादी पुरक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

अपंग मुले जी अतितीव्र अपंगत्वामुळे सामान्य शाळेमध्ये शिक्षण घेऊ शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यान्वित असलेल्या अपंगांच्या विशेष शाळेमध्ये त्यांना मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच विशेष शिक्षणाबरोबर व्यवसाय प्रशिक्षणाचीदेखील त्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

अपंग मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणामध्ये पुर्व प्राथमिक शिक्षणाचा अंर्तभाव करण्यात येईल.

उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या, शैक्षणिक शुल्क, वसतिगृहे, संशोधनासाठी फेलोशिप, प्रशिक्षणासाठी विद्यावेतन, निरंतर व बहिस्थ: शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्त्या इत्यादी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. याकरीता सामाजिक न्याय विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात येईल.

## २.४ रोजगार व स्वयंरोजगार:

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील कलम ३२ ते ३८ मधील तरतूदीप्रमाणे अपंग व्यक्तींना अथवा अनोखे सामर्थ्य असणाऱ्या व्यक्तींच्या नोकरीकरीता अपंग व्यक्ती काम करू शकतील अशा सुयोग्य पदांची केंद्र शासनाने केलेल्या पदनिश्चितीप्रमाणे निश्चित करून त्यांना शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये तीन टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्या आरक्षणाप्रमाणे अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष भरती मोहिम हाती घेतलेली आहे. त्याव्दारे अपंग व्यक्तींना नोकऱ्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, पदोन्नतीकरीता गट-क मधून गट-क मध्ये, तसेच गट-ड मधून गट-ड मध्ये व गट-ड मधून

गट-क मध्ये पदोन्नतीमध्ये ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

अपंग व्यक्तींच्या नोकरीसाठी रोजगार व स्वयंरोजगारात केंद्रामध्ये अपंग व्यक्तींसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्या कक्षाव्दारे अपंग व्यक्तींना रोजगार उपलब्ध होण्याच्यादृष्टीने ३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी प्रत्येक आस्थापनेने केली आहे किंवा कसे? त्याची तपासणी करण्यात येईल व त्यांच्याकडून नियमित अहवाल मागविण्यात येतील.

अपंग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अपंग व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात ३ टक्के जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागामार्फत अपंगांच्या विशेष कार्यशाळांमधून अपंग व्यक्तींना व्यवसाय प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्या सुविधांचा लाभ अपंगांना प्रभावीपणे देण्यात येईल.

स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी अपंग व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या बीजभांडवल योजना व महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

खाजगी क्षेत्रात अपंग व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरीता केंद्र शासनाने प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना कार्यान्वित केलेली आहे. या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी कामगार व उद्योग विभागामार्फत करण्यात येईल.

अपंग व्यक्तींच्या रोजगारासाठी राष्ट्रीय अपंग पुरस्कार व राज्य अपंग पुरस्कार योजना कार्यान्वित आहे. या योजनांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात येईल.

## २.५ <u>अडथळा विरहीत मुक्त संचार व्यवस्था:</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील कलम ४४, ४५ व ४६ मध्ये तरतूदीप्रमाणे अपंग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी सहज, सुलभरित्या व मुक्त संचार करता यावा यासाठी सार्वजनिक ठिकाणी अपंगांना आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येईल.

(एक) नवीन इमारतीच्या बांधकामास परवानगी देण्यासंदर्भात महानगरपालिका व नगरपरिषदेच्या बांधकाम नियमावलीमध्ये केंद्र शासनाच्या मॉडेल बायलॉजप्रमाणे नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक २५.०२.२००२ अन्वये फेरबदल करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये अपंगांच्या अडथळा विरहीत मुक्त संचार व्यवस्था उदा. पार्किंग, रॅम्प्स, रेलिंग्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स इत्यादींचा समावेश आहे. त्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल.

(दोन) सार्वजनिक इमारतीमध्ये अपंगांसाठी अडथळा विरहीत वातावरण निर्मीतीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने शासन निर्णय दिनांक ०२.१२.२००३ अन्वये सार्वजनिक इमारती, ठिकाणे यांचे परिक्षण करण्यासाठी अ<u>ॅक्सेस ऑडीट कमिटी</u> अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली असून या समितीमार्फत सर्व सार्वजनिक इमारतीचे ॲक्सेस ऑडीट पुर्ण करून त्या इमारतीमध्ये अपंग व्यक्तींना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

(तीन) सार्वजनिक ठिकाणे उदा. उद्याने, रस्ते, इत्यादी ठिकाणी संबंधीत महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या सहभागाने अपंगांना मुक्त संचार व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल.

(चार) राज्य शासन निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्था वगैरेच्या सार्वजनिक वाहनामध्ये अपंगांसाठी आसणे आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. त्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच या वाहनामध्ये सुलभ प्रवेश मिळण्याच्या दृष्टीने त्यांच्या संरचनेत आवश्यक ते फेरबदल करण्यात येईल.

(पाच) वर्दळ असलेल्या निवडक ठिकाणी अंध व्यक्तींसाठी सिग्नल यंत्रणा त्यांना समजेल अशा विशिष्ठ आवाजाची स्थापित करण्यात येईल. तसेच यासाठी झेब्रा क्रॉसिंगच्या पृष्ठभागावर योग्य ते फेरबदल करण्यात येतील. यासाठी संबंधीत महानगनरपालिका व गृह विभागाच्या वतीने योग्य त्या उपाय योजना करण्यात येतील.

## २.६ <u>अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देणे:</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ४२ प्रमाणे सामाजिक न्याय व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यामार्फत व समन्वयाने अपंग व्यक्तींमध्ये गतिशिलता निर्माण करून पुनर्वसनाच्या दृष्टीने कृत्रिम अवयव व साधने, तीन चाकी सायकल, व्हील चेअर्स, सर्जिकल फुटवेअर, लो-व्हीजन एड्स, हिअरींग एडस् स्पेशल मोबिलिटी, एड्स इत्यादी उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी केंद्र शासनाची कृत्रिम अवयव व साधने पुरविणे ही योजना कार्यान्वित असून या याजनेची राज्यात परिणामकारक अंमलबजावणी करून या योजनेखाली लाभ सर्व राज्यातील अपंग व्यक्तींना देण्यात येईल. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राच्या योजनेप्रमाणे राज्यात १७ जिल्ह्यांमध्ये जिल्हा पुनर्वसन केंद्र कार्यान्वित झालेले आहेत. या केंद्राव्दारे त्या जिल्ह्यातील अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देण्यात येतील. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, विरार व कृत्रिम अवयव व साधने पुरविणे या योजनेतून अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

त्याचप्रमाणे जे अंध, मुकबधिर, अस्थिव्यंग व सेरेब्रेल पाल्सी अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत आहेत. त्यांना शासन निर्णय दिनांक ०३.०६.२०११, २७.०४.२०११ व दिनांक २०.०७.२०११ अन्वये त्यांना आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरीता लागणारी आवश्यक ते तंत्रज्ञान व सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

## २.७ अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे :

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ कलम २ (पी) अन्वये अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक २९.०४.१९९९ अन्वये अधिसूचना जारी करून जिल्हास्तरावर वैद्यकीय मंडळाची स्थापना केलेली आहे. तसेच अपंग व्यक्तींना अपंगत्वाची प्रमाणपत्रे सहजरित्या उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ग्रामिण रूग्णालयामध्ये तज्ञांची सुविधा उपलब्ध करून त्या ठिकाणी अपंगत्वाची प्रमाणपत्रे देण्यात यावीत असे दिनांक २२.०३.२०१० च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत.

राज्यातील प्रत्येक अपंग व्यक्तींकडे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे व प्रमाणपत्राअभावी राज्यातील एकही अपंग व्यक्ती सुविधांच्या लाभांपासून वंचित राहू नये यासाठी उपाय योजना करण्यात येईल. यामध्ये आंध्र प्रदेश राज्याच्या धर्तीवर "सदारेम" सारखे सॉफ्टवेअर तयार करून प्रत्येक अपंग व्यक्तींना संगणीकृत अपंगत्वाचे प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यात येईल. हे ओळखपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येईल याकरीता शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्रामिण विकास विभाग व महिला बाल विकास विभाग तसेच खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचा सहभाग घेण्यात येईल.

## २.८ अपंग व्यक्तींकरीता सामाजिक सुरक्षितता :

अपंग व्यक्ती अधिनिमय १९९५ मधील कलम ३८ प्रमाणे अपंग व्यक्तींच्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत वा करण्यात येतील.

(एक) सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केल्यानंतर नोकरी न मिळालेल्या बेरोजगार अपंग व्यक्तींना बेकारभत्ता देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल.

(दोन) सध्या दारिद्र्य रेषेखालील ८० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग व्यक्तींना संजय गांधी निराधार योजनेखाली रूपये ६००/- दरमहा अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेतून सर्व पात्र अपंग लाभ धारकांना लाभ देण्यात येईल.

(तीन) तसेच ५० वर्षावरील निराधार अपंग व्यक्तींना अनुदान देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल.

(चार) वृध्दावस्थेत अपंग कर्मचाऱ्यांचे तसेच व्यक्तींना वैद्यकीय खर्च भागविता यावा व त्यांचे जीवन सुसहाय्य व्हावे यासाठी मेडीक्लेम सारखी योजना कार्यान्वित करण्यात येईल्.

(पाच) अतितिव्र अपंग व्यक्ती तसेच मतिमंद व बहुविकलांग व्यक्तींकरीता कायमस्वरूपी निवारागृहे स्थापन करण्यात येतील.

## २.९ <u>अपंग व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची नोंदणी व त्यांना प्रोत्साहनात्मक सहाय्यक अनुदान :</u>

अपंग व्यक्ती अधिनिमय १९९५ च्या कलम ५० व ५२ प्रमाणे अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांची नोंदणी करण्यात येईल. ही नोंदणी करण्यासाठी राज्य शासनाने सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांना घोषित करण्यात आलेले असून नोंदणी करण्यासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या नियमावलीप्रमाणे नोंदणीचे काम सध्या करण्यात येत आहे. त्याप्रमाणे सर्व पात्र संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल.

नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त संस्था अपंगांच्या विशेष शाळा/कार्यकाशाळा चालवित आहेत. अशा शाळा/कार्यशाळांना शासनाच्या निधीच्या उपलब्धतेनुसार त्यांना सहाय्यक अनुदान देण्यात येईल. सद्यस्थितीत ७३७ अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांना वेतनावर १०० टक्के, वेतनेत्तर ८ टक्के, इमारत भाडे ७५ टक्के व निवासी विद्यार्थ्याकरीता परिपोषण अनुदान रूपये ६३०/- दरमहा देण्यात येते. त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त संस्थांचे शाळा/कार्यशाळेचे तसेच इतर अपंगांच्या उपक्रमांना केंद्र शासनाच्या दिनदयाळ योजनेतून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याकरीता संस्थांना माहिती मार्गदर्शन करून त्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास राज्य शासनामार्फत पाठवून त्यांना अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अधिक प्रभावीपणे करण्यात येतील.

## २.१० <u>अपंग व्यक्तींना सवलतीच्या दराने जागा उपलब्ध करून देणे :</u>

अपंग व्यक्ती अधिनिमय १९९५ च्या कलम ४३ प्रमाणे अपंग व्यक्तींना निवास, वाणिज्य व व्यवसायिक, विशेष करमणूक केंद्र, विशेष शाळा, संशोधन केंद्र व उद्योगासाठी सवलतीच्या दराने जागा उपलब्ध करून देण्याचे धोरण महसूल व वनविभाग शासन निर्णय

दिनांक २६.०४.२००१ व २५.०७.२००७ अन्वये कार्यान्वित केलेले असून, या धोरणाप्रमाणे अपंग व्यक्तींना जागा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.

तसेच शहरी भागात नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात नगरविकास विभागाने वरील कारणांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्याचा शासन परिपत्रक दिनांक २८.१२.२००६ अन्वये निर्गमित केलेला आहे, त्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल.

अपंग व्यक्तींना सवलतीच्या दराने जागा घेण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.

## २.११ <u>प्रवासाच्या सुविधा:</u>

अपंग व्यक्तींमध्ये गतीशिलता येण्यासाठी व त्यांना सार्वजनिक वाहनानी प्रवास करणे सोयीचे व्हावे यासाठी सार्वजनिक वाहनाच्या संरचनेत योग्य ते फेरबदल करून त्यांच्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाने तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वजनिक वाहनामध्ये आसने आरक्षित केलेली आहेत.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये अपंग व्यक्तींना ७५ टक्के व त्यांच्या सोबत्यास ५० टक्के प्रवासभाडे सवलत देण्यात आलेली आहे व ही सवलत त्यांना सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या अपंगांच्या ओळखपत्राच्या आधारे घेता येतील. तसेच काही महानगरपालिकेने ठराव करून आपल्या क्षेत्रातील अपंग व्यक्तींना मोफत प्रवासाच्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

तेव्हा राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन मंडळाच्या बसेसमध्ये तसेच महानगरपालिकेच्या बसेसमध्ये अपंग व्यक्तींना मोफत प्रवासाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.

## २.१२ <u>संशोधन:</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ चे कलम ४८ प्रमाणे अपंग क्षेत्रामध्ये अपंगत्व प्रतिबंधक उपाय, सहाय्यभूत साधने, समाजाभिमुख पुनर्वसन कार्यक्रम, सुयोग्य पदनिश्चिती, अपंगांच्या कार्याचे ठिकाण अथवा कंपनीमध्ये अपंगांना सुयोग्य सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी विषयावर संशोधन कार्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांना राज्य शासनामार्फत अनुदान देण्याची उपाययोजना करण्यात येईल व त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल.

## २.१३ <u>खेळ व करमणूक:</u>

अपंग व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे प्रतिवर्षी शासनामार्फत आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील काही स्वयंसेवी संस्थांमार्फत/असोसिएशन मार्फत खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच पुणे बालकल्याण संस्था, पुणे या ठिकाणी अपंग विद्यार्थ्यांच्या मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे शिक्षण देण्यात येते.

अपंग व्यक्तींच्या खेळ व करमणूकीसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अपंग भवनाची निर्मिती करून या ठिकाणी अपंग व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी व मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची योग्य ती उपाययोजना करण्यात येईल.

राज्यस्तरीय अपंग क्रीडा स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांना नोकरीत आरक्षण तसेच प्राधान्य इत्यादी सुविधा देण्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. अपंगांच्या खेळ व करमणूकीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरीता सामाजिक न्याय विभागाबरोबरच शालेय शिक्षण व युवक व क्रीडा विभागाचे सहकार्य घेण्यात येईल.

## २.१४ प्रचार व प्रसार:

अपंग व्यक्तींच्या पुनर्वसनाकरीता केंद्र शासन व राज्य शासन तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. अपंगांच्या हक्कांसाठी अपंग अधिनियम १९९५, राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९ तसेच युएनसीआरपीडी १९८६ इत्यादीची माहिती विविध योजना नियम अधिनियमातील तरतूदी ही समाजातील सर्व घटकांना व्हावी याबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती व्हावी तसेच अपंगत्व प्रतिबंधात्मक व निवारणात्मक कार्यक्रम अपंग व्यक्तींपर्यंत पोहोचावेत यासाठी माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील प्रचार व प्रसाराच्या अद्ययावत तंत्राचा उपयोग करून प्रसिध्दी देण्यात येईल. सद्यस्थितीतत माहिती फलक व पुस्तिकेव्दारे प्रसिध्दी करण्यात येत आहे. यामध्ये वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक्स मेडीयाचा उपयोग करून घेण्यात येईल व त्यासाठी योग्य ती उपायोजना करण्यात येईल.

## २.१५ माहितीचे संकलन व प्रसिध्दी:

सन २००१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये अपंग व्यक्तींची जनगणना करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सन २०११ च्या जनगणनेमध्ये अपंग व्यक्तींची जनगणना करण्यात आलेली आहे. तथापी, त्यांची आकडेवारी अद्याप उपलब्ध झालेली नाही. तेव्हा अपंग व्यक्तींची सामाजिक व आर्थिक पाहणी सर्व्हेक्षणाव्दारे करण्यात येईल व त्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी सर्व्हेक्षणाची योजना कार्यान्वित करण्यात येईल.

त्याचप्रमाणे अपंग व्यक्तींसाठी असणाऱ्या केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती अपंगांना होऊन त्यांना त्याचा लाभ घेता यावा यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत सहजसाध्य वेबसाईट (accessible website) तयार करण्यात येईल.

अपंग व्यक्तींमध्ये जनजागृती निर्माण व्हावी व त्यांना विविध कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी याकरीता शासनामार्फत प्रत्येक जिल्ह्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल व यामध्ये माहिती व जनसंपर्क विभागाचा सहभाग राहील. तसेच माहिती व प्रसिध्दीसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यामध्ये माहिती व जनसंपर्क विभागाचा सहभाग राहील.

# ३. कृती आराखडा

## ३.१ अपंगत्वाचे प्रबंधन, शोध व शीघ्र निदान:

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम २५ च्या तरतूदीप्रमाणे मुळातच अपंगत्व येऊ नये यासाठी अपंगत्वाचे प्रबंधन, शोध व शीघ्र निदान, उपचार, प्रशिक्षण व जनजागृतीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करील.

(एक) अपंग प्रतिबंधासाठी अपंगत्वाचा शोध, शिघ्र निदान आणि तात्काळ उपचार याकरता सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, महिला व बाल कल्याण आणि शिक्षण विभाग यांच्या सहकार्यायाने अपंगत्व प्रतिबंधत्व कार्यक्रम राबविताना वरील विभागातील अंगणवाडी सेविका/कार्यकर्ती, आरोग्य सेवक, शिक्षक, वैद्यकीय अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी/गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी आणि जिल्हा परिषद स्तरावरील सर्व खाते प्रमुख यांना सर्व्हेक्षणाकरीता दरम्यान प्रशिक्षण देणेकरीता प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. यासाठी खालीलप्रमाणे कालबध्द कृती कार्यक्रम ठरविण्यात येईल.

| | |
|---|---|
| प्रतितालुका किमान शिबिर-२ / (शिक्षक/अंगणवाडी कार्यकर्ती /आरोग्य सेवक) | ७०६ |
| वैद्यकीय अधिकारी शिबिर प्रतिजिल्हा किमान -१ | ०३५ |
| सर्व विभागप्रमुख शिबिर प्रतिजिल्हा किमान -१ | ०३५ |
| महानगरपालिकास्तर किमान -१ | ०२२ |
| | एकूण ७९८ |

तालुक्याचे, जिल्ह्याचे तसेच महानगरपालिकेचे स्वरुप लक्षात घेवून जादा प्रशिक्षण शिबीराची गरज भासल्यास त्याप्रमाणे प्रशिक्षण शिबीरे घेण्यात येतील.

(दोन) अपंगत्वाचे सर्व्हेक्षण, शोध, प्रशिक्षण यानंतर प्रत्यक्ष निदान, मार्गदर्शन व उपचार शिबिरे आयोजित करण्यात येईल.

| | |
|---|---|
| ➢ प्रतितालुका किमान शिबिर-१ | ३५३ |
| ➢ जिल्हास्तरीय किमान शिबिर-१ | ०३५ |
| ➢ महानगरपालिकास्तर किमान शिबिर-१ | ०२२ |
| एकूण शिबिरे | ४१० |

तालुक्याचे, जिल्ह्याचे तसेच महानगरपालिकेचे स्वरुप लक्षात घेवून जादा प्रशिक्षण शिबीराची गरज भासल्यास त्याप्रमाणे प्रशिक्षण शिबीरे घेण्यात येतील. शस्त्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार जेवढा खर्च येईल तेवढा अनुज्ञेय राहील तसेच लाभार्थ्यांची संख्या मर्यादीत राहणार नसून सर्व गरजू लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

(तीन) अपंग प्रतिबंधात्मक कार्यक्रमांतर्गत उपचार व शस्त्रक्रीयेनंतर अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव, साधने, उपकरणे पुरविणे. उदा. कर्णबधिरांना श्रवण यंत्रे, अस्थिव्यंगांसाठी व्हील चेअर्स, तीन चाकी सायकल, कुबड्या, कॅलिपर्स, कृत्रिम अवयव स्प्लींड्स, करेक्टीव्ह शूज, अंध व मतिमंद अपंगांना सहाय्यभूत साधने इत्यादी. गरजेनुसार व तज्ञांच्या शिफारशीनुसार साधने पुरविण्यात येतील. कमाल लाभार्थ्याची मर्यादा राहणार नाही.

(चार) अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी केंद्र शासनाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे सक्षम प्राधिकारी निश्चित करून संगणकीकृत अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(पाच) अपंगत्व प्रतिबंधासाठी आरोग्य विभागामार्फत सद्यस्थितीत लसीकरणाचे व माता बाल संगोपनाचे कार्यक्रम कार्यान्वित आहेत त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

## ३.२ <u>शिक्षण:</u>

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मध्ये कलम २६ च्या तरतूदीप्रमाणे वयाच्या १८ वर्षापर्यंत अपंग विद्यार्थ्यांना योग्य अशा वातावरणात मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(एक) सामाजिक न्याय विभागांतर्गत सद्यस्थितीत ७३७ अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा अनुदान तत्वावर कार्यरत आहेत. याशाळांमध्ये एकूण ३५००० विद्यार्थ्यांचे परिरक्षण करण्यात येत आहे. आणि ९३८ शाळा/कर्मशाळा विना अनुदान व कायमविना अनुदान तत्वावर कार्यरत आहेत. या शाळांमध्ये ४०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळा/कर्मशाळांसाठी सद्यस्थितीत शासनाकडून कोणतेही आर्थिक मदत मिळत नसल्याने या मुलांच्या परिरक्षणात व्यत्यय निर्माण होत आहे. अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ अंतर्गत अपंग मुलांना मोफत शिक्षणाची हमी देण्यात आली असल्याने या शाळा/कर्मशाळांना अनुदान तत्वावर आणून त्यांचे प्रभावी परिरक्षण करणे आवश्यक आहे.

यासाठी शिक्षणाचे मुल्यमापन करण्यासाठी यंत्रणा तयार करण्यात येईल व विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षण देण्याचे धोरण आखण्यात येईल.

(दोन) अपंग विद्यार्थ्यांना सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेण्यासाठी ६ ते १४ वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांसाठीची केंद्रे शासनाची सर्वशिक्षा अभियान योजना राज्य

शासनाने कार्यान्वित केलेली असून, या योजनेची शालेय शिक्षण विभागाकडूनपरिणामकारक अंमलबजावणी करून या योजनेचा लाभ अपंग विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

(तीन) अपंग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य मुलांबरोबर सर्वसामान्य शाळेत शिक्षण घेता यावे व त्यांची शालेय प्रगती साधण्यासाठी १४ वर्षावरील अपंग विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शिक्षणाकरीता एकात्मिक शिक्षण युनिटची स्थापना करून साधन शिक्षकाव्दारे विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करून अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान २० युनिट
- ३५ जिल्ह्यांसाठी किमान ७०० युनिट

(चार) अपंग विद्यार्थ्यांने पदवी शिक्षण पुर्ण केल्यानंतर पुढील देशोत्तर उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे. ही शिष्यवृत्ती अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येते. त्याच धर्तीवर अपंग विद्यार्थ्यांना देण्यात येईल त्यासाठी नॉनक्रिमीलेअरची मर्यादा राहणार नाही.

- प्रतिवर्षी राज्यातून किमान २५ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

(पाच) सर्वसाधारणपणे विशेष शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, शालेय साहित्य, पाठ्यपुस्तके ब्रेल पुस्तके व ब्रेल किट्स व आवश्यक असणारे सहाय्यभूत उपकरणे पुरविण्यात येतील.

- अंदाजित किमान विद्यार्थी २०००००

(सहा) मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय व्हावी याकरीता शासकीय वसतिगृह सुरू करण्यात येईल.

- प्रतिजिल्हास्तर किमान १ वसतिगृह
- विभागीय स्तरावर किमान १ वसतिगृह
- प्रतिवसतिगृह प्रवेशित मान्य क्षमता जिल्हास्तरावर १०० व विभागीय स्तरावर २०० विद्यार्थी.
- मुला मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह असतील

(सात) मध्येच शाळा सोडलेल्या अपंग विद्यार्थ्यांसाठी सामान्य शाळा संलग्नित रात्र अभ्यासिका सुरू करणे तसेच पत्रव्यवहाराव्दारे शिक्षणाची संधी अपंग विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान ४ रात्र अभ्यासिका व निरंतर शिक्षण केंद्र
- ३५ जिल्ह्यांसाठी किमान १४० रात्र अभ्यासिका व निरंतर शिक्षण केंद्र

(आठ) अपंग व्यक्तींना रोजगार (नोकरी) उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक उन्नती व्हावी व त्यांना स्वालंबी जीवन व्यथीत करता यावे यासाठी विविध शासकीय / निम शासकीय बँकींग इत्यादी क्षेत्रातील सेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या परिक्षेमध्ये यश संपदन होण्याच्या दृष्टीने अपंग व्यक्तींना स्पर्धा परिक्षापूर्व प्रशिक्षणाची सोय करण्यात येईल याकरिता विद्यापीठे, मान्य खाजगी व इतर मान्यवर स्पर्धापूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये अपंग विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास त्याचे शुल्क शासनाकडून देण्यात येईल.

- एकूण किमान विद्यार्थी ५००

(नऊ) अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातात.

**अ) शालांत परिक्षा पुर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती** - अपंग शाळेतील अनिवासी विद्यार्थी तसेच सामान्य शाळेतील इयत्ता १ ली ते १० पर्यंत अपंग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न लावता शालेय शिक्षणासाठी शालांत पुर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेखाली खालील दराने शिष्यवृत्ती रक्कम प्रदान केली जाते.

| **क्र.** | **इयत्ता** | **शिष्यवृत्तीचा दर** |
|---|---|---|
| १. | इयत्ता १ ली ते ४ थी (कर्णबधिरांसाठी पायरी वर्गापासून ) | दरमहा रूपये ५०/- |
| २. | इयत्ता ५ वी ते ७ वी | दरमहा रूपये ७५/- |
| ३. | इयत्ता ८ वी ते १० वी | दरमहा रूपये १००/- |
| ४. | मतिमंद व मानसिक विकलांग विद्यार्थी (नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळांतील) | दरमहा रूपये ७५/- |

**ब) शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती** -

अंध, अधूदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरूग्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी नंतरचे महाविद्यालयीन व्यवसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमाचे गट करून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अंपग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

| **क्र** | **अभ्यासक्रमाचा गट** | **शिष्यवृत्तीची रक्कम** | |
|---|---|---|---|
| | | **वसतिगृहात राहणारे** | **वसतिगृहात न राहणारे** |
| १. | **गट अ** (वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण, ॲग्रीकल्चर, व्हीटरनरी मधील पदवी व पदव्युत्तर | दरमहा रूपये ४२५/- | दरमहा रूपये १९०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | शिक्षण) | | |
| २. | **गट ब** (अभियांत्रिकी, तांत्रिक स्थापत्य, वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रूपये २९०/- | दरमहा रूपये १९०/- |
| ३. | **गट क** (कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यवसायिक पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रूपये २९०/- | दरमहा रूपये १९०/- |
| ४. | **गट ड** (व्दितीय वर्षे व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम) | दरमहा रूपये २३०/- | दरमहा रूपये १२०/- |
| ५. | **गट इ** (११ वी, १२ वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम) | दरमहा रूपये १५०/- | दरमहा रूपये ९०/- |

या शिष्यवृत्तीच्या योजनेकरीता पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देऊन एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

(दहा) अंध व अस्थिव्यंगांने अधू असलेल्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी लेखनिक व अर्धातास जादाची वेळ देण्यात येईल.

(अकरा) मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी एक भाषा (1 language formula) पध्दत वापरण्यात येईल.

(बारा) अंध तसेच कर्णबधिर विद्यार्थ्यांना गणितऐवजी इयत्ता ७ वी अंकगणित तसेच हस्तकलेसारखे दुय्यम विषय घेऊन एस.एस.सी. परिक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(तेरा) अपंग क्षेत्रातील तज्ञ मनुष्यबळ विकसीत करण्यासाठी राष्ट्रीय पुनर्वसन परिषद (आर.सी.आय.) मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्र राज्यात कार्यान्वित आहेत त्यांना आवश्यक ते सहाय्य व प्रोत्साहन देण्यात येईल.

(चौदा) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ३९ प्रमाणे शालेय शिक्षण विभागाने पुर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेशासाठी ३ टक्के जागा अपंग विद्यार्थ्यांना आरक्षित केलेल्या आहेत. महाविद्यालये, तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणासाठी अपंगांना प्रवेशासाठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

(पंधरा) अपंग विद्यार्थ्यांना व व्यक्तींना मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल. यामधून अपंग व्यक्तींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व स्थानिक महानगरपालिकेच्या व नगरपालिकेच्या बस प्रवासासाठी मोफत प्रवासाची सुविधा अपंग ओळखपत्रावर उपलब्ध करून देण्यात येईल व यासाठीचा १/४

दराने खर्चाची मागणी महामंडळाने अथवा नगरपालिकेने केल्यानंतर सामाजिक न्याय विभागामर्फत त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल. राज्यातील एकूण लाभार्थी किमान ८००००

## ३.३ रोजगार:

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ३२ ते ३८ च्या तरतूदीप्रमाणे अपंग व्यक्तींच्या रोजगार व स्वयंरोजगाराविषयी खालीलप्रमाणे उपाययोजनाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(एक) अपंग व्यक्तींच्या रोजगारासाठी शासकीय व निमशासकीय सेवेतील अपंगांसाठीचे सुयोग्य पदे केंद्र शासनाने केलेल्या पदनिश्चितीप्रमाणे निश्चित करावेत व जी राज्य शासनाच्या सेवेतील पदे केंद्र शासनाच्या सुयोग्य पदाच्या निश्चितीमध्ये समाविष्ठ नाहीत अशा पदांचा प्रस्ताव राज्य शासनाने गठीत केलेल्या पदनिश्चिती समीतीसमोर ठेऊन त्या पदांची निश्चिती करण्यात येईल व तसे सामाजिक न्याय विभागाने आदेश निर्गमित केलेले आहेत त्याची कार्यवाही करण्यात येईल.

(दोन) अपंग व्यक्तींना शासकीय व निमशासकीय सेवेत गट-अ, ब, क आणि ड मध्ये ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे त्याप्रमाणे अपंगांच्या जागा विशेष भरती मोहिमेव्दारे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये अपंगांचा अनुशेष भरून काढण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

(तीन) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्यातील शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये अपंग व्यक्तींना सुयोग्य पदनिश्चितीनुसार गट-ड ते गट-अ मध्ये पदोन्नती देणेकरीता (शासन निर्णय दिनांक ०५.०३.२००२ अन्वये गट-ड मधून गट-ड मध्ये, गट-ड मधून गट-क मध्ये आणि गट-क मधून गट-क मध्ये पदोन्नती देणेबाबत शासन धोरण निश्चित करण्यात आले आहे तथापी गट-ब मधून गट-ब मध्ये आणि गट-ब मधून गट-अ मध्ये पदोन्नती देण्याकरता शासन आदेश निर्गमित करण्यात येतील.)

तसेच अपंग व्यक्तींच्या आरक्षणाची टक्केवारी ५ टक्क्यापर्यंत वाढवून त्यामध्ये मतिमंद, डिस्लेक्सीया व कुष्ठरोगमुक्त अपंगांचा समावेश करण्यात येईल. तसेच अपंगांच्या विशेष शाळा / कार्यशाळांमध्ये ५० टक्क्यापर्यंत अपंग कर्मचारी घेण्यात येतील. तसेच अपंगत्वाच्या प्रमाणपत्र पडताळणीकरिता समिती गठीत करण्यात येईल.

(चार) अपंग व्यक्तींच्या रोजगारासाठी त्यांचे स्वतंत्र नोंदणी करणे, त्याचप्रमाणे अपंगांच्या आरक्षणाकरीता पदे भरली आहेत किंवा नाहीत यासाठी तपासणी करणे, नियमित अहवाल मागविणे, यासाठी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयामध्ये अपंगांसाठी

स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे या कक्षाव्दारे अपंगांच्या रोजगाराच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात येतील.

(पाच) अपंग व्यक्तींच्या रोजगार निर्मितीसाठी, अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे या अंतर्गत रूपये १.५० लाखापर्यंतच्या व्यवसायाकरीता ८० टक्के भाग बँकेमार्फत कर्ज व २० टक्के अथवा कमाल रूपये ३००००/- अनुदान उपलब्ध करून देण्याची योजना कार्यान्वित आहे. त्यातून खालीलप्रमाणे अपंगांना लाभ देण्यात येईल.

- प्रति तालुका किमान लाभार्थी २५.
- एकूण तालुके ३५३ * २५ = ८८२५
- एकूण महानगरपालिका २२ * ५० = ४४० .

एकूण लाभार्थी = ९२६५

सदर योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत असून बँकांनी कर्ज मंजूर करण्यासाठी स्थानिक स्तर समितीमार्फत जिल्हा स्तरावर विशेष प्रयत्न करण्यात येतील. कमाल लाभार्थी संख्येची मर्यादा राहणार नाही.

(सहा) अपंग व्यक्ती स्वयंसहायता गट स्थापन करणे (बचतगट) त्यांना स्वयंरोजगाराकरीता प्रशिक्षण व अर्थसहाय्य पुरविण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल. ५ अपंग व्यक्तींचा एक गट, जिल्हा प्रत्येकी १५० गट, महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रत्येकी ५० गट

- याप्रमाणे ३३ जिल्हे * १५० = ४९५० बचत गट
- २२ महानगरपालिका * ५० = ४४० बचत गट

एकूण बचत गट= ५३९०

सदर योजनेची अंमलबजावणी अंगणवाडी कार्यकर्ता व ग्रामसेवकांच्या सहाय्याने सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येईल. या ठिकाणी गटाची कमाल मर्यादा राहणार नाही.

(सात) अपंग व्यक्तींना लघुउद्योगासाठी बीजभांडवल उपलब्ध करून देण्यासाठी योजना कार्यान्वित करण्यात येईल. यामध्ये लघुउद्योगाची प्रकल्प मर्यादा रूपये १०.०० लाख यापैकी ५० टक्के कर्ज बँकेमार्फत, ३० टक्के अनुदान बीज भांडवल योजनेअंतर्गत, २० टक्के अपंग व्यक्ती /समुहाचा स्वत:चा निधी असेल.

- प्रति जिल्हा किमान ५ लाभार्थी
- प्रति महानगरपालिका किमान १० लाभार्थी
- याप्रमाणे ३५ जिल्हे * ५ लाभार्थी = १७५ लाभार्थी
- २२ महानगरपालिका * १०लाभार्थी=२२० लाभार्थी

एकूण लाभार्थी = ३९५ लाभार्थी

अपंग व्यक्तींना कर्ज मंजुरीसाठी बँका तसेच शिखर बँक इत्यादींकडून कर्ज मंजूर करण्याबाबत विशेष प्रयत्न करण्यात येतील.

(आठ) प्रशिक्षित अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारा करीता सायबर कॅफे/सॉफ्टवेअर/लघुउद्योगाकरीता अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल. यामध्ये सेवा योजन कार्यालयात नाव नोंदणी करून २ वर्षात नोकरी उपलब्ध न झालेल्या बेरोजगार अपंगांना अनुदान देण्याची योजना कार्यान्वित न झाल्याने संगणक पदवी/पदविका धारक अपंगांना स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी स्वयंरोजगारा करीता सायबर कॅफे/सॉफ्टवेअर उद्योग करीता अर्थसहाय्य देणे.

अशा अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा याकरीता रूपये ५.०० लाख रूपये खर्चाच्या मर्यादेत अपंग व्यक्तींना सायबर कॅफेची उभारणी करून तो चालविण्यासाठी ३० टक्के अनुदान व ५० टक्के बँकेमार्फत कर्ज सहाय्य आणि २० टक्के लाभार्थ्यांचा स्वतःचा निधी उभारून ही योजना राबविण्यात येईल.

- जिल्हास्तरावर किमान ५ लाभार्थी ३५
- महानरगपालिका स्तरावर किमान १० लाभार्थी २२
- याप्रमाणे ५*३५ + १०*२२ एकूण ३९५

लाभार्थ्यांना या योजनेमार्फत लाभ देण्यात येईल. सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येईल. यासाठी स्थानिक प्राधिकारणाचे सहकार्य घेण्यात येईल.

(नऊ) महाराष्ट्र अपंग वित्त व विकास महामंडळाकडे असलेली प्रलंबित कर्ज प्रकरणे, निकाली काढणे महाराष्ट्र अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत कर्ज प्रकरणे निकाली काढण्यात येतील. त्यामध्ये महामंडळाकडील विविध कर्जाच्या योजनामधील प्रलंबित अर्ज ५००० असून लाभार्थ्यांसाठी सदर योजनेची अंमलबजावणी सामाजिक न्याय विभागाच्या महाराष्ट्र अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत करण्यात येईल.

(दहा) अपंग व्यक्तींकरीता रोजगार निर्मितीसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येईल. अपंग व्यक्तींना रोजगारासाठी मार्गदर्शन करणे, अपंग व्यक्तींचे बचतगट स्थापन करणे व त्यांना व्यवसाय मार्गदर्शन व अनुदान उपलब्ध करून देणे यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत सदर योजना खालील प्रमाणे राबविण्यात येईल. यासाठी एक दिवसीय शिबिर आयोजित करणे.

- प्रतितालुका किमान शिबिर-१ (एकदिवसीय) ३५३
- जिल्हास्तरीय किमान शिबिर-१ ०३५
- महानगरपालिकास्तर किमान शिबिर-१ ०२२

**एकूण ४१०**

- प्रतिशिबिर लाभार्थी-१००

(अकरा) अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ४० मधील तरतूदीप्रमाणे दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमांतर्गत कार्यान्वित असलेल्या प्रत्येक योजनेतील ३ टक्केपेक्षा कमी नाही इतका निधी अपंगांकरीता आरक्षित करण्यात येईल. तसेच प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वैयक्तिक सहाय्य योजनेत ग्रामिण विकास विभागाने निधी आरक्षित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे ३ टक्के निधी अपंगांसाठी राखून ठेऊन अपंगांसाठी खर्च करण्यात येईल.

(बारा) अपंग व्यक्तींना अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकाने / इतर व्यवसायिक परवाने देण्यात येतील. अपंग व्यक्तींच्या स्वयंरोजगाराच्या दृष्टीने स्वस्त धान्य दुकाने, एजन्सीज वाटप करताना अपंग व्यक्तींस प्राधान्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. यासाठी एजन्सीची यादी निश्चित करण्यात येईल व एकूण वाटप करणाऱ्या एजन्सीत ५ टक्के परवाने अपंगांसाठी आरक्षीत करण्यात येतील यामध्ये मतिमंद, अपंगत्वाचा समावेश करण्यात येईल.

- प्रति तालुका किमान १ याप्रमाणे
- ३५३ तालुके * ३ लाभार्थी
- २२२ नगरपालिका * २ लाभार्थी
- २२ महानगरपालिका*१० लाभार्थी

(तेरा) अपंग शेतकऱ्यांना कृषी विभाग / जिल्हा परिषद तसेच जिल्हा ग्राम विकास यंत्रणेमार्फत शेती उद्योगासाठी सुविधा पुरविण्याची योजना कार्यान्वित करून या योजनेतून अपंग शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शेती कसण्यासाठी लागणाऱ्या सुविधा उदा. बैल जोडी, शेतीसाठी आवश्यक असणारी औजारे, इंधन विहीर, विहीर, इंजन, पाईपलाईन, ट्रक्टर, मळनी यंत्र इत्यादीसाठी शेतीसाठी लागणाऱ्या साधनाच्या स्वरुपाप्रमाणे रुपये ५० हजार ते १.०० लाख पर्यंत अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

- किमान लाभार्थी १०००

## ३.४ सवलतीच्या दरात अपंग व्यक्तींना जागा / गाळे उपलब्ध करून देणे:

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ४३ मधील तरतूदीप्रमाणे कार्यान्वित असलेल्या योजनांची कार्यवाही करण्यात येईल. तसेच खालीलप्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात येतील.

(एक) अपंग व्यक्तींना व्यवसायाकरता सवलतीच्या दराने २०० चौ.फू. जागा व्यवसाय व वाणिज्यिक कारणासाठी व्यापार गाळे/स्टॉल विनालिलाव उपलब्ध होण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. हे गाळे दर्शनीय भागात देण्यात येतील तसेच मागणी

करणाऱ्या अपंगांची संख्या जास्त असल्यास चिठ्ठया टाकून सोडत केली जाईल. त्याचप्रमाणे आधारभूत किंमतीच्या ५० टक्के दराने हे गाळे अपंगांना देण्यात येतील.

महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्र (नगरविकास विभाग)

- प्रतिनगरपालिकास्तर किमान ५ गाळे २२२ न.पा.
  महानगरपालिकास्तर किमान ५०ग्गगाळे ०२२
  कटक मंडळे-५ गाळे ०७
  ग्रामपंचायतस्तर (ग्रामविकास विभाग)
- प्रतिग्रामपंचायतस्तर-किमान २ गाळे २७९१६
- पंचायतसमितीस्तर किमान ५ गाळे ३५३
- जिल्हा परिषदस्तर किमान ५ गाळे ३३

(दोन) अपंग व्यक्तींना वैयक्तीक घरकूल योजना कार्यान्वित करून यामधून अपंग व्यक्तींचे मुलभूत गरजापैकी निवारा (घर) ही मुलभूत गजर अपंग व्यक्ती उपलब्ध करुन देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाधानाने जीवन जगता यावे यासाठी अपंग व्यक्तींना वैयक्तिक घरकूल देण्याची योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| क्र | क्षेत्र | खर्चाची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| १. | ग्रामिण | १.०० |
| २. | नगरपालिका | १.५० |
| ३. | महानगरपालिका | २.०० |

- राज्यातील किमान एकूण लाभार्थी १०००

## ३.५ <u>अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देणे:</u>

(एक) अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने व्हीलचेअर, तीन चाकी सायकल, श्रवणयंत्रे, लो व्हीजन एड्स, मोबिलिटी एक उपलब्ध करून देण्याकरीता केंद्र शासनाची कृत्रिम अवयव व साधने पुरविणे ही योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त संस्थेमार्फत अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

(दोन) केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रे, स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने सुरू केलेले असून, जिल्हाधिकारी हे या केंद्राच्या व्यवस्थापन मंडळाचे प्रमुख आहेत त्या केंद्रामार्फत अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव साधने व सहाय्यभूत उपकरणे पुरविण्यात येतील.

(तीन) अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत योजना राबविली जाते. या योजनेतून रूपये ३००० पर्यंतची साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

(चार) राज्य शासनाची जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, विरार ही संस्था, कार्यरत असून या संस्थेमार्फत अपंग व्यक्तींना समुपदेशन, व्यवसायिक मार्गदर्शन, थेरापिटीक सेवा आणि कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

(पाच) शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्त झालेल्या अंध, अधूदृष्टी, मुकबधिर व अस्थिव्यंग अपंगांने अपंग असलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०३.०६.२०११, २७.०४.२०११ व २०.०७.२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(सहा) जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राची स्थापना करण्याची योजना कार्यान्वित करून या योजनेमधून प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक अपंग पुनर्वसन केंद्र स्थापन करून त्यामधून अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव साधने उपलब्ध करून देण्याकरीता अपंग व्यक्तींचा शोध घेणे, त्यांच्या गरजा निश्चित करणे, त्यांना मार्गदर्शन करणे व गरजेप्रमाणे अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करून देण्याकरीता व त्यांच्या दुरूस्तीकरीता जिल्हास्तरावर जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राची स्थापना करणे. हे केंद्र जिल्ह्यातील अपंग भवन म्हणून कार्यरत राहील.

- प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान १ केंद्र
- एकूण ३५ केंद्रे
- एका केंद्रासाठी अंदाजित १००० लाभार्थी

## ३.६ <u>अडथळा विरहीत वातावरण निर्मिती:</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या कलम ४४, ४५ व ४६ प्रमाणे खालीलप्रमाणे अपंग व्यक्तींच्या मुक्त संचाराकरीता कार्यवाही करण्यात येईल.

(एक) सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, उद्याने इत्यादी अपंगासाठी अडथळा विरहीत करण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल. यामधून ॲक्सेस ऑडीट पथकामार्फत सार्वजनिक इमारती/ठिकाणे इत्यादीचे ॲक्सेस ऑडीट करून या ठिकाणी अपंग व्यक्तींना सुलभ संचार करता यावा याकरीता सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, उद्याने इत्यादी अपंगासाठी अडथळा विरहीत करण्यात येतील. सदर योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल.

(दोन) शासकीय इमारतीमध्ये अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करण्याची योजना कार्यान्वित करून अपंग व्यक्तींना सुलभ संचार करता यावा याकरीता अस्थिव्यंगांकरीता इमारतीमध्ये रॅम्प्स, रेलिंग, लिफ्ट, शौचालय, पार्किंग इत्यादीची सोय करणे, अंधांकरीता सिग्नल्स तसेच वॉकिंग पाथ करणे, कर्णबधिरांकरीता माहितीदर्शक फलक इत्यादी. सदर योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणे आवश्यक आहे.

## ३.७ <u>सामाजिक सुरक्षा:</u>

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील कलम ३८ प्रमाणे अपंग व्यक्तींच्या सामाजिक सुरक्षतितेच्या दृष्टीने खालील प्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात येतील.

(एक) नोंदणीकृत बेरोजगार अपंग व्यक्तींना बेरोजगार भत्ता देण्याची योजना कार्यान्वित करून या योजनेतून जिल्हा रोजगार विनिमय केंद्रामध्ये नोंदणी केलेल्या व तीन वर्षात रोजगार प्राप्त न झालेल्या अपंग व्यक्तींना दरमहा आर्थिक मदत बेरोजगार भत्ता म्हणून देण्यात येईल. यामधून अंदाजित ८०००० लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

(दोन) वृध्दापकाळ निवृत्ती योजना कार्यान्वित करून ५० वर्षे पूर्ण असलेल्या वृध्द अपंग व्यक्तींच्या मुलभूत गरजा व वैद्यकीय गरजा पूर्णत्वास नेऊन त्यांचा वृध्दापकाळ सुसह्य करण्यात येईल.

- प्रतितालुका किमान लाभार्थी २५ ३५३
- प्रतिलाभार्थी रू.५००/- दरमहा

अतितीव्र अपंगत्व असलेल्या व्यक्तीस दरमहा रुपये १०००/- मदत देण्यात येईल.

(तीन) गंभीर अपंगत्व/बहुविकलांग/मतिमंद प्रौढांकरीता आधारगृह योजना कार्यान्वित करून यामधून बहुविकलांग व्यक्तींचे पालन पोषण होणे त्यांच्या पालकांना त्यांच्या पश्चात मुलांचा सांभाळ होणे. तसेच मतिमंदांची संवेदनशीलपणे काळजी घेणे करिता अशा आधार गृहाची योजना राबविणे आवश्यक आहे.

- जिल्हास्तरावरील किमान ५० पुरुष व ५० स्त्रीया लाभार्थ्याचे १ याप्रमाणे
- विभागीयस्तरावरील जिल्ह्यासाठी किमान १०० पुरुष व ५० स्त्रीया लाभार्थ्यांसाठी ६ याप्रमाणे

(चार) अपंग व्यक्तीच्या विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना कार्यान्वित करून या योजनेमधून अपंग व्यक्ती बरोबर अव्यंग अथवा सदृढ वधू अथवा वराने विवाह

करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता अंतरजातीच्या विवाहाच्या धर्तीवर अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. राज्यातील किमान एकूण लाभार्थी १०० राहतील.

(पाच) गरजू अपंग व्यक्तींना मोफत कायदेविषयक सेवा, सल्ला व मार्गदर्शनाची सोय करणे ही योजना कार्यान्वित करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत गरजू अपंग व्यक्तींना मोफत कायदेशीर सेवा, सल्ला व मार्गदशन सेवा विधी व न्याय विभागार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

## ३.८ माहिती व प्रसिध्दी :

(एक) अपंग कल्याणाच्या योजना, विविध उपक्रम, उपाययोजना इत्यादीचा प्रचार व प्रसिध्दीची योजना कार्यान्वित करून या योजनेतून अपंगांच्या कल्याणार्थ विविध योजना, उपक्रमे यांना ग्राम व जिल्हा पातळीवर व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी देणेसाठी दूरदर्शन, वृत्तपत्रे, आकाशवाणी, नियतकालिके, पथनाट्ये, कलापथके इत्यादीमार्फत प्रसिध्दी देण्यात येईल व त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याकरीता आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल.

## ३.९ संशोधनात्मक कार्य :

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ चे कलम ४८ प्रमाणे अपंग क्षेत्रामध्ये अपंगत्व प्रतिबंधक उपाय, सहाय्यभूत साधने, समाजाभिमुख पुनर्वसन कार्यक्रम, सुयोग्य पदनिश्चिती, अपंगांच्या कार्याचे ठिकाण अथवा कंपनीमध्ये अपंगांना सुयोग्य सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी विषयावर संशोधन कार्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांना राज्य शासनामार्फत अनुदान देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल.

## ३.१० खेळ व करमणूक :

अपंग व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे प्रतिवर्षी शासनामार्फत आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील काही स्वयंसेवी संस्थांमार्फत/असोसिएशन मार्फत खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच पुणे बालकल्याण संस्था, पुणे या ठिकाणी अपंग विद्यार्थ्यांच्या मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे शिक्षण देण्यात येते. या योजनेचा लाभ अपंग व्यक्तींना प्रभावीपणे देण्यात येईल.

अपंग व्यक्तींच्या खेळ व करमणूकीसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अपंग भवनाची निर्मिती करून या ठिकाणी अपंग व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी व मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना कार्यान्वित करण्यात येईल.

राज्यस्तरीय अपंग क्रीडा स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांना नोकरीत आरक्षण तसेच प्राधान्य इत्यादी सुविधा देण्याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. अपंगांच्या खेळ व करमणूकीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याकरीता सामाजिक न्याय विभागाबरोबरच शालेय शिक्षण व युवक व क्रीडा विभागाचे सहकार्य घेण्यात येईल.

## ३.११ अपंग व्यक्तींसाठी ॲक्सेसीबल वेबसाईट :

अपंग व्यक्तींसाठी असणाऱ्या केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती अपंगांना होऊन त्यांना त्याचा लाभ घेता यावा यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत सहजसाध्य वेबसाईट (accessible website) तयार करण्यात येईल.

## ३.१२ अंमलबजावणी व संनियंत्रण यंत्रणा :

कृती आराखडयाची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरिता यंत्रणा निर्माण करणेची योजना कार्यान्वित करून या योजनेखाली अपंग कल्याण आयुक्तालयाचे बळकटीकरण करण्यात येऊन अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ व युएनसीआरपीडी मधील तरतुदीची अंमलबजावणी करण्याकरिता व त्यानुषंगाने आखण्यात आलेल्या योजनांची व कृती आराखडयामधील योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी व शासनाच्या विविध विभागाशी सनियंत्रण व समन्वस साधन्यासाठी यंत्रणा आवश्यक आहे. यंत्रणेशिवाय या कृति आराखडयाची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येणार नाही. यासाठी आयुक्तालय स्तरावरील तसेच विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर कार्यालये व त्याकरिता यंत्रणा आवश्यक आहे यासाठी अपंग कल्याण आयुक्तालयाचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. व त्याकरिता राज्यस्तर, विभागीय स्तर, जिल्हा स्तर व तालुकास्तरावर एकूण ९९० कर्मचारी पदे निर्माण करणे आवश्यक आहेत.

*  *  *